# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक १४/१२/२०२५

## दरोडा टाकणाऱ्या आरोपीतांना अवघ्या १२ तासात केले निष्पन्न. २ गुन्हे उघड, ७ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवनी :— पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत फिर्यादी नामे अब्दुल गफार अब्दुल करीम, वय ७९ वर्ष, रा गांधी चौक पारशिवनी हे त्यांचे पत्नी सह घरी हजर असताना अनोळखी इसमांनी फिर्यादीचे घरात घुसुन फिर्यादीला मारहाण करून फिर्यादीच्या पत्नीच्या गळयातील १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र किंमती ५०,०००/— रू जबरीने ओढुन काढुन घेतले. तसेच किचन रूम मध्ये जावुन रूममध्ये असलेले लोखंडी कपाट उघडुन अंदाजे १०००/— रू लुटुन मोटरसायकलने पळुन गेले. अश्या फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे दिनांक १३/१२/२०२५ रोजी अपराध क्रमांक ५९४/२५ कलम ३०९(६), ३(५), भान्यासं, सन २०२३ गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचे गांर्भिय लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनातयांच्या मार्गदर्शनात पारशिवणी पोलीसांसोबत स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी सुध्दा तात्काळ सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला.अवघ्या १२ तासात स्थानिक गुन्हे शाखा यांनी तांत्रिक पुरावे आणि गोपनिय बातमीदारांच्या माहिती वरून आरोपी १. **मंगेश रतीराम उईके, वय २६ वर्ष राहणार धापेवाडा** यास ताब्यात घेऊन कौशल्यपूर्ण विचारपूस करून आरोपीने मुख्य आरोपी **२. तनवीर युनुस कुरेशी,रा. धापेवाडा** याचे सांगणे वरून इतर साथीदार आरोपींचे मदतीने गुन्हा केल्याचे सांगितल्याने सदर गुन्हयात आरोपी क्रं १ आणि २ यांच्या सह आरोपी क्रं **३. प्रवीण देवराव महीकारकर, वय २८ वर्षे, राहणार इंदिरानगर वार्ड क्रमांक १२, ब्राह्मणी, तालुका कळमेश्वर, जिल्हा नागपूर ४. कमलेश उर्फ छोट्यादिलीप पंधराम, वय २१ वर्ष, राहणार इंदिरानगर तालुका कळमेश्वर, जिल्हा नागपूर, ५. अक्षय राजकुमार बनसोड, वय २२ वर्षे, राहणार राडगाव डोरली, मुक्काम कळमेश्वर इंदिरानगर झोपडपट्टी, ६. आदित्य महेंद्र शर्मा, वय २१ वर्षे, राहणार ब्राह्मणी शिक्षक कॉलनी** यांचाशोध घेऊन ताब्यात घेण्यात आले. सदर गुन्हयातील आरोपी क्रं ७. **अब्दुल मतीन अब्दुल गफार शेख, वय ५२ वर्ष, राहणार पालोरा तालुका पार्सल जिल्हा नागपूर हा फिर्यादीचा मुलगा असुन त्यानेच** त्याचे वडिलांसोबत मालमत्तेच्या हिस्से वाटणीचे मत भेद असून त्याने गुन्हयातील इतर आरोपींना माझे वडिलांकडे प्रॉपर्टी विक्रीचे खूप रुपये आहेत घरात घुसून लुटून घ्या अशी माहिती दिल्या वरून गुन्हा केल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे नमुद आरोपीतांनी २०२४ मध्ये फिर्यादीचे घरात घुसून चाळीस हजार रुपये जबरीने चोरी करून नेल्याचे उघड केले. आरोपींना ताब्यात घेऊन त्यांचेकडुन **१) रोख रक्कम**

नगदी ९५००/—रुपये २) मोसा क्र.एम एच ४० झेड ५२८८ किंमती ५०,०००/—रूपये ३) मोसा क्र एम एच ४० ए एन ७९२२ किंमती ५०,०००/—रू ४) ०२ अँड्रॉइड मोबाईल ५) १ कीपॅड मोबाइल असा एकुण १,५५,५००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीतांना अटक केली आहे. अवघ्या १२ तासात गंभीर गुन्हा उघड केल्या बाबत मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखेच कौतुक केले.

अपराध दो वारदातों का खुलासा, ₹1.55 लाख का माल बरामद

# पारशिवनी में डकैती डालनेवाले 7 गिरफ्तार

लोकमत समाचार सेवा

**पारशिवनी :** शहर में एक वृद्ध दंपति के घर में घुसकर मारपीट कर सोने का मंगलसूत्र और नगदी लूटने वाले सात आरोपियों को स्थानीय अपराध शाखा ने रविवार 14 दिसंबर को गिरफ्तार किया है. पुलिस के अनुसार आरोपियों से पूछताछ में दो डकैती की वारदातों का खुलासा हुआ है. गिरफ्तार आरोपियों में मंगेश रतीराम उइके (26 वर्ष) और तनवीर यूनुस कुरैशी (दोनों धापेवाड़ा, तह. कलमेश्वर), प्रवीण देवराव महिकारकर (28 वर्ष), कमलेश उर्फ छोट्या दिलीप पंधराम (21 वर्ष), अक्षय राजकुमार बनसोड (22 वर्ष) तीनों इंदिरानगर वार्ड क्रमांक-12, ब्राह्मणी, कलमेश्वर, आदित्य महेंद्र शर्मा (21 वर्ष, शिक्षक कॉलोनी, ब्राह्मणी, कलमेश्वर) तथा अब्दुल मतीन अब्दुल गफ्फार शेख (52 वर्ष, पालोरा, तह. पारशिवनी) शामिल है.

पुलिस के मुताबिक, शनिवार 13 दिसंबर को महात्मा गांधी चौक, पारशिवनी निवासी अब्दुल गफ्फार अब्दुल करीम (79 वर्ष) और उनकी पत्नी घर पर थे. इसी दौरान अज्ञात बदमाशों ने घर में घुसकर उनके साथ मारपीट की और महिला के गले से करीब 50 हजार रुपए का सोने का मंगलसूत्र तथा एक हजार रुपए नगदी लूटकर दोपहिया वाहन से फरार हो गए. इस संबंध में पारशिवनी थाने में मामला दर्ज किया था. समानांतर जांच में एलसीबी की टीम ने तकनीकी साक्ष्यों के आधार पर धापेवाड़ा से मंगेश उइके को हिरासत में लेकर पूछताछ की. उसने अपराध कबूल करते हुए अपने साथियों के नाम बताए, जिसके बाद अन्य छह आरोपियों को अलग-अलग स्थानों से पकड़कर गिरफ्तार किया गया और आगे की कार्रवाई के लिए पारशिवनी पुलिस के हवाले किया गया.

आरोपियों से 9,500 रुपए नगदी, दो दोपहिया वाहन, दो मोबाइल फोन और एक मोबाइल की-पैड सहित कुल 1 लाख 55 हजार 500 रुपए का माल जब्त किया गया. दोनों वारदातें पारशिवनी थाना क्षेत्र की बताई जा रही हैं. आगे की जांच पारशिवनी पुलिस कर रही है.



कार्रवाई में जब्त माल के साथ स्थानीय अपराध शाखा का दल.

## बेटे ने दी थी डकैती की सूचना

पुलिस जांच में सामने आया कि तनवीर यूनुस कुरैशी इस वारदात का मुख्य आरोपी है. वहीं, गिरफ्तार आरोपियों में शामिल अब्दुल मतीन शेख शिकायतकर्ता अब्दुल गफ्फार का बेटा है. पैतृक संपत्ति के बंटवारे को लेकर विवाद के चलते उसने अपने पिता के पास नगदी होने की जानकारी देकर डकैती की योजना बनवाई थी.

लोकमत
नागपूर, मंगळवार, दि. १६ डिसेंबर २०२५

# दरोडेखोरांची टोळी 'एलसीबी'च्या जाळ्यात

## सातजणांना वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक : दोन गुन्हे उघड

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** पारशिवनी शहरात राहणाऱ्या वृद्धाच्या घरात शिरून त्यांना मारहाण करीत सोन्याचे मंगळसूत्र व रोख रक्कम लुटून नेणाऱ्या सात दरोडेखोरांना स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने रविवारी (दि. १४) अटक केली. त्या दरोडेखोरांकडून दोन गुन्हे उघड झाल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.

अटक करण्यात आलेल्या आरोपी दरोडेखोरांमध्ये मंगेश रतीराम उईके (२६), तनवीर युनुस कुरेशी (दोघेही रा. धापेवाडा, ता. कळमेश्वर), प्रवीण देवराव महिकारकर (२८), कमलेश ऊर्फ छोट्या दिलीप पंधराम (२१), अक्षय राजकुमार बनसोड (२२, तिघेही रा. राहणार इंदिरानगर वॉर्ड क्रमांक-१२), ब्राह्मणी, कळमेश्वर, आदित्य महेंद्र शर्मा (२१, रा. शिक्षक कॉलनी, ब्राह्मणी, कळमेश्वर) अब्दुल मतीन अब्दुल गफ्फार शेख (५२, रा. पालोरा, ता. पारशिवनी) या सातजणांचा समावेश आहे.

अब्दुल गफ्फार अब्दुल करीम (७९, रा. महात्मा गांधी चौक, पारशिवनी) व त्यांच्या पत्नी शनिवारी (दि.१३) घरी असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश केला आणि त्यांना मारहाण करीत पत्नीच्या गळ्यातील ५० हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र आणि एक हजार रुपये रोख हिसकावून घेत सर्व जण दुचाकीने पळून गेले. याप्रकरणी पारशिवनी पोलिसांनी भारतीय न्यायसंहिता (बीएनएस) ३०९ (६), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. या घटनेच्या समांतर तपासात एलसीबीच्या पथकाने तांत्रिक माहितीच्या आधारे मंगेश उईके यास धापेवाडा येथून ताब्यात घेत विचारपूस केली. त्याने गुन्ह्याची कबुली देत साथीदारांची नावे सांगितली. त्यामुळे या पथकाने अन्य सहाजणांना वेगवेगळ्या ठिकाणांहून ताब्यात घेत सर्वांना अटक केली आणि पुढील तपासासाठी पारशिवनी पोलिसांच्या सुपूर्द केले.



अटकेतील दरोडेखोरांकडून जप्त केलेल्या साहित्यांसह कामगिरी बजावणारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

### मुलानेच केली लुटमारीची सूचना

तनवीर युनूस कुरेशी हा या घटनेतील मुख्य आरोपी आहे. आरोपींपैकी अब्दुल मतीन अब्दुल गफ्फार शेख हा फिर्यादी अब्दुल गफ्फार अब्दुल करीम यांचा मुलगा होय. अब्दुल मतीन याला त्याच्या वडिलांकडून वडिलोपार्जित संपत्तीची वाटणी करून घ्यायची होती. अब्दुल गफ्फार हे वाटणी करण्यास नकार देत असल्याने त्याने तनवीर युनूस याला भेटून अब्दुल गफ्फार यांनी त्यांच्या मालकीचा काही स्थावर संपत्ती विकल्याने त्यांच्याकडे भरपूर रक्कम आहे. ती रक्कम लुटून न्या, अशी सूचना केली होती.

### १.५५ लाखाचा मुद्देमाल जप्त

अटक करण्यात आलेल्या टोळीकडून दोन गुन्हे उघड झाले असून, दोन्ही गुन्हे पारशिवनी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आहेत. एलसीबीच्या पथकाने या दरोडेखोरांकडून ९,५०० रुपये रोख, ५० हजार रुपयांची एमएच-४०/झेड-५२८८ क्रमांकाची दुचाकी, ५० हजार रुपयांची एमएच-४०/एएन-७९२२ क्रमांकाची दुचाकी, दोन मोबाइल फोन आणि एक मोबाइल की पॅड असा एकूण १ लाख ५५ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या घटनेचा पुढील तपास पारशिवनी पोलिस करीत आहेत.